दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शनिवार ६ जूले २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३२५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये



गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता


# पेपरफुटीच्या संदर्भाने शिंदे सरकारने आणले विधेयक
# महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अन्याय प्रतिबंध) कायदा, २०२४

## स्पर्धा परीक्षेतील अनुचित मार्ग आणि गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांना होणार ५ वर्षे तुरुंगवास आणि १० लाखांचा दंड

### दंड न भरल्यास ही तरतूद लागू होईल


दंड न भरल्यास, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील तरतुदींनुसार अतिरिक्त कारावासाची शिक्षा दिली जाईल. स्पर्धा परीक्षांच्या संचालनात व्यत्यय येऊ नये यासाठी तरतुदी करणे, प्रश्नपत्रिका निश्चित करणाऱ्यांची कर्तव्ये निश्चित करणे, पोलिस उपअधीक्षक किंवा सहायक पोलिस आयुक्तांच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यांना गुन्ह्याच्या तपासासाठी सक्षम करणे आदी बाबींचा या विधेयकात समावेश आहे.



**वादळवार्ता/विशेष**
उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारनंतर महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे सरकारनेही स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता रोखण्यासाठी विधेयक आणले आहे. या विधेयकात दोषींना ५ वर्षांपर्यंतची शिक्षा आणि मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. नीट पेपर लीकच्या सीबीआय तपासादरम्यान महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्याच्या शिंदे सरकारने स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता रोखण्यासाठी विधानसभेत विधेयक आणले आहे. स्पर्धा परीक्षांमधील अनुचित मार्गास प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबधीत किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक असे याचे नाव आहे. स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता रोखणे हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. या विधेयकात पेपरफुटी किंवा अनियमितता प्रकरणी दोषी आढळणाऱ्यांना ५ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत 'महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अन्याय प्रतिबंध) कायदा, २०२४' विधेयक मांडले. या विधेयकांतर्गत स्पर्धा परीक्षांशी संबंधित गुन्हे दखलपात्र, अजामीनपात्र आणि अदखलपात्र असतील. स्पर्धा परीक्षेतील अनुचित मार्ग आणि गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांना किमान तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होईल. ज्यामध्ये पाच वर्षांपर्यंत वाढ केली जाऊ शकते आणि १० लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो असे या विधेयकात म्हटले आहे. सीबीआयचा दोन राज्यात तळ नीट पेपर लीक प्रकरणी बिहारपासून गुजरातपर्यंत सीबीआय चौकशी सुरू आहे. सीबीआयचे एक पथक बिहारची राजधानी पाटणा येथे तर दुसरी टीम गुजरातमधील गोध्रा येथे आहे. याप्रकरणी सीबीआयने आतापर्यंत अनेकांना अटक केली आहे. पेपरफुटी प्रकरणाची सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. दरम्यान शिक्षण मंत्रालयाने शुक्रवारी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. यामध्ये सर्व स्पर्धात्मक परीक्षा निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी सरकार आणि त्यांच्या संस्था वचनबद्ध आहेत. परीक्षांच्या पार्श्वभूमीवर प्रश्नपत्रिका गोपनीय ठेवणे हे सरकारचे सर्वात मोठे प्राधान्य आहे. ज्या गुन्हेगारांनी प्रश्नपत्रिकेची गोपनीयता भंग केली आहे, असे सरकारने म्हटले आहे.










# टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाला ११ कोटींचे पारितोषिक-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## विधिमंडळात कर्णधार रोहित शर्मांसह सहका-यांचा विशेष सन्मान वंदे मातरमब ,भारत माता की जय.. घोषणांनी दणाणले मध्यवर्ती सभागृह

**मुंबई/पंकज भंडारी**

भारत हा क्रिकेटमध्ये विश्वगुरू आहे. हे आपल्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाने सिद्ध केले आहे. पराभवाच्या छायेतून विजय खेचून आणून, कर्णधार रोहित शर्मा आणि त्याच्या संघाने भारतीयांची छाती अभिमानाने फुलून यावी अशी कामगिरी केली आहे, अशा शब्दांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्वविजेत्या भारतीय संघावर कौतुकाची उधळण केली. तसेच भारतीय संघासाठी महाराष्ट्र शासनाच्यावतीने अकरा कोटी रुपयांचे विशेष पारितोषिक जाहीर केले. मुंबई महानगर प्रदेशात भविष्यात भव्य आणि आधुनिक असे स्टेडियम उभारण्यास गती देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार रोहित शर्मासह, त्याचे सहकारी सुर्यकूमार यादव, यशस्वी जयस्वाल, शिवम् दुबे, प्रशिक्षक पारस म्हाब्रे, संघ व्यवस्थापक अरूण कानडे यांचा आज विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात विशेष सत्कार करण्यात आला. खचाखच भरलेले हे मध्यवर्ती सभागृह आज क्रिकेटच्या जल्लोषाने दणाणून गेले. भारतीय राष्ट्रध्वज उंचावून सभागृहात भारत माता की जय आणि वंदे मातरम् च्या घोषणाही घुमल्या. '...हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा, हुकला तो संपला या क्रिकेटमधीलच विक्रमादित्य लिटल मास्टर सुनील गावस्कर यांच्या आवाजातील गाण्याने आणि हिंदी चित्रपट "चक दे इंडिया..!' च्या जल्लोषी सुरांनी सभागृह सुरवातीपासूनच निनादून गेले. यातच टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि सहकाऱ्यांचं आगमन होताच सभागृहातील घोषणा आणखी टिपेला पोहोचल्या. या विशेष समारंभास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, संसदिय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार ॲड. आशिष शेलार, दोन्ही विधीमंडळातील सदस्य, क्रिडाप्रेमी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, ' या स्पर्धेत आपल्या भारतीय संघाने पाकिस्तानच्या संघाल हरवल तेव्हाच आपण अर्धा विश्वचषक जिंकला. सुर्यकुमार यादव च्या अजरामर झेलमुळे आपण विश्वचषक जिंकला आणि देशभरात गेले आठवडाभर जल्लोष सुरु झाला. आपले पंतप्रधान नरेंद्र



मोदी यांनी देखील भारतीय संघाचं अभिनंदन केले आहे. या विजयामुळे देशवासियांचा, देशाचा गौरव झाला आहे, या भावनाने भारतीय संघाचे स्वागत करत आहेत. याच साठी काल विजेत्या संघाच्या स्वागतासाठी मुंबईत अरबी समुद्राच्या शेजारीच जनसागर उसळला होता. आपल्या या संघाने भारतच क्रिकेटमध्ये विश्वगुरू आहे हे सिद्ध केले आहे. मुंबई ही क्रिकेटची पंढरी आहे. आपले वारकरी विठ्ठलच्या दर्शनासाठी वारीमध्ये सहभागी झाले आहेत. तर काल क्रिकेटप्रेमी वारकरी याच भावनेने मुंबईकडे आले आहोते. मुंबईत दिवाळी-दसराच साजरा झाला. भारतीय संघात मुंबईकर चार खेळाडू आहेत. कर्णधार रोहीत शर्मासह, सुर्यकूमार हे विजयाचे शिल्पकार आहेत याचा सर्वांनाच अभिमान आहे. विशेष म्हणजे एकही सामना न हारता, या संघांने विश्वचषक जिंकला आहे, ही ऐतिहासिक कामगिरी असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. भारतीय संघातील मुंबईतील अनेक दिग्गज आणि महान क्रिकेटपटुंचा समावेश असल्याचा उल्लेख करून मुख्यमंत्री म्हणाले की, १९८३ चा विश्वचषक आपण कपिल देव यांनी घेतलेल्या त्या एका झेलमुळे जिंकलो होतो. कपिल देव यांचा तो झेल आणि सुर्यकूमार यादव यांचा या स्पर्धेतील झेल हा भारतीयांसाठी अजरामर क्षण ठरला आहे. हे विश्वविजेतेपद प्रत्येक भारतीयांच्या आकांक्षेचे प्रतिक आहे. या मुंबईकर खेळाडूंनी आपल्या नावाप्रमाणेच भारताची विजयी पताका जगात फडकवली आहे. त्यांनी यापुढेही भारतीयांना असाच आनंदोत्सव साजरा करण्याची संधी मिळवून द्यावी, यासाठी मुख्यमंत्र्यांनी भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भारतीय संघाने आपल्या सर्वांसाठी आनंदाचा क्षण आणला आहे. एका अपराजित संघाने विश्वचषक जिंकला आहे. रोहीत शर्मांनी अद्वितीय कामगिरी करत, भारतीय क्रिकेटच्या दिग्गजांच्या मांदियाळीत स्थान पटकावले आहे. रोहित यांनी कपिल देव, महेंद्रसिंह धोनी यांच्यानंतर आपला नावलौकीक केला आहे. कर्णधार म्हणून रोहित यांनी संघातील सहकाऱ्यांचा जिंकलेला विश्वास हा महत्वाचा आहे. त्यांची नेतृत्व शैली ही भारतीय संघाच्या कर्णधाराची परंपरा राखणारी आहे. मुंबईकर हे सर्व खेळाडू महाराष्ट्राचा अभिमान असल्याचेही सांगून आता मुंबई क्रिकेट असोसिएशनने मुंबईत 1 लाखापेक्षा जास्त क्षमता आधुनिक स्टेडिअम बांधण्याची सूचना त्यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनकडे केली. भारतीय संघाच्या स्वागतासाठी मुंबईकरांनी केलेली गर्दी अभूतपूर्व होती. मात्र कोणत्याही मुंबईकरांनी नियमांची शिस्त मोडली नाही, त्यामुळे त्यांनी मुंबईकराचे अभिनंदन केले. उपमुख्यमंत्री श्री पवार म्हणाले, की विधानभवनात असा दिमाखदार समारंभ होतो आहे, याचे मोठे समाधान आहे. चमत्कार घडेल असे वाटत होते आणि चमत्कार घडला. आपला क्रीडा रसिक आगळावेगळा आहे. मरिन ड्राईव्हला अभूतपूर्व गर्दी झाली होती. भारतीय या क्रिकेटवर प्रेम करतात, असे प्रेम जगात कुठेही दिसत नाही. यात अमेरिकासारखा संघ ही पुढे आला आहे. सुर्यकूमार यांचा झेल हा अप्रतिमच होता. अनेक दिग्गजांनी भारतात क्रिकेट रुजवले त्यामुळे आपल्याकडे उत्तम क्रिकेटपटू घडू शकले. यापुढे रोहित टी-२० खेळणार नाही.पण यापुढे ज्या-ज्यावेळी आपण टी-२० पाहू, त्यावेळी रोहितची आठवण आल्याशिवाय राहणार नाही. विधानसभेचे अध्यक्ष ॲड. नार्वेकर म्हणाले की, भारतीय क्रिकेट संघाने प्रत्येकाला अभिमानाचा क्षण मिळवून दिला. क्रिकेटमुळे विधीमंडळ कामकाज करतांनाही मदत होते, असे सांगत त्यांनी विधिमंडळातर्फे खेळाडूंना शुभेच्छा देऊन आगामी काळात गौरवशाली क्षण मिळवून देण्याबद्दल त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, विधानभवनात प्रथमच अशाप्रकारचा कार्यक्रम होत आहे. हा सोहळा महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने होणारा सत्कार होता. खेळाडुंच्या विजयासाठी प्रत्येक नागरिकाने शुभेच्छा व्यक्त केल्या होत्या. या अभूतपूर्व विजयानंतर क्रिकेटसह सर्व क्षेत्रातील प्रगतीसाठी एकत्र यावे, असेही आवाहन उपसभापती डॉ.गोऱ्हे यांनी केले. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते कर्णधार रोहित शर्मा यांच्यासह सत्कारमुर्तींचे वैशिष्ट्यपूर्ण ट्रॉफी, विधानमंडळाचे स्मृतीचिन्ह, छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनाधिष्ठित मुर्ती, शाल आणि पुष्पगूच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कर्णधार रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, यशस्वी जयस्वाल, शिवम दुबे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रीयन असल्याचा आम्हाला अभिमान आहे. या सत्कार सोहळ्याने आनंदित झालो आहोत. काल आणि आज झालेले स्वागत आम्ही कधीच विसरू शकणार नाहीत. मुंबई पोलिसांनी केलेले नियोजन अप्रतिम होते. विश्वकरंडक जिंकणे हे आमचे स्वप्न होते. सर्व खेळाडूंनी बजावलेल्या सांघिक प्रयत्नांमुळे हा करंडक जिंकता आला. या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल त्यांनी संयोजकांचे आभार मानले. विधानभवनाचे जनसंपर्क अधिकारी नीलेश मदाने यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# अत्यावश्यक दुरुस्ती तात्काळ करून द्या-डॉ. शंकर धपाटे

## सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्या सूचना

अंबाजोगाई/परवेज पटेल

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयातील वर्ग तीन कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची आज दुपारी अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी अचानक येऊन पाहणी केली. त्यावेळी सर्व समस्या जाणून घेत अत्यावश्यक ज्या गोष्टी आहेत त्या तात्काळ दुरुस्त करून देण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या दुरवस्थेबाबत सातत्याने ओरड होत आहे. ती दुरुस्त करून देण्यात यावी या मागणीसाठी नुकतेच डीवाय एफआय व कर्मचाऱ्यांच्या वतीने आंदोलनही करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आज अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी स्वाराती मधील वर्ग तीन कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची आज दुपारी येऊन अचानक पाणी केली. त्यावेळी त्यांनी चालू असलेल्या कामाचाही आढावा घेतला. कर्मचाऱ्यांना ज्या समस्यांना सामोरे जावे लागतात व ज्या अत्यावश्यक गोष्टी आहेत त्या तात्काळ करून देण्याची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंतांना सूचना केली त्यामध्ये ड्रेनेज दुरुस्ती, खिडक्या, दरवाजे यांच्यासह जी तात्काळ आवश्यकता आहे ती प्राधान्याने करा. कर्मचाऱ्यांची अडचण लक्षात घेऊन लवकरात लवकर करून द्या. त्याचबरोबर आज तागायत जी कामे झाली आहे त्याची माहिती सादर करा असेही तोंडी आदेश बांधकाम विभागाला देण्यात आले. त्यावेळी त्यांच्यासोबत डॉ.राकेश जाधव, डॉ. नितीन चाटे, डॉ. कचरे, डॉ. वेदपाठक, संबंधित विभागाचे लिपिक सुनील जोगदंड, अंकुश गित्ते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता गुडवाले, माचवे, नंदु मोरे डीवायएफआयचे तालुका अध्यक्ष देविदास जाधव पत्रकार सह कर्मचारी उपस्थित होते.



# कौशल्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय पाटेगाव शाळेत खासदार संदीपानजी भुमरे यांची भेट

**पैठण/चैताली औटे**

विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित कौशल्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय पाटेगाव शाळेस आज दिनांक 5 जुलै शुक्रवार रोजी खासदार श्री संदीपानजी भुमरे साहेब यांच्या हस्ते श्री विलासबापू भुमरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी सर्वप्रथम संदीपानजी भुमरे साहेब यांच्या हस्ते शाळेमध्ये वृक्षाचे रोपण करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांतजी गायकवाड साहेब,महाविद्यालयाचे प्राचार्य श्री निलेशजी गायकवाड सर यांच्या हस्ते श्री संदीपानजी भुमरे साहेब यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी स्टेजवर अनिलतात्या नरवडे,अनिलजी मुळे,नंदू अण्णा काळे,पाटेगावचे सरपंच श्री गोकुळशेठ रावस, ग्रामपंचायत सदस्य,पंचक्रोशीतील विविध गावातील सरपंच, व नागरिक तसेच,पाटेगाव केंद्रातर्गत येणाऱ्या शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांतजी गायकवाड साहेब यांनी प्रास्तविक सादर करतांना 24 वर्षांपासून कौशल्या विद्यामंदीर व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी भुमरे साहेबांच्या मोलाच्या सहकार्यातून व मार्गदर्शनाने पंचक्रोशीतील विद्यार्थी महाविद्यालयात



शिक्षण घेतात. परंतु 12 वी नंतरचे पुढील शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे भुमरे साहेबांनी पाटेगाव शाळेत ठिकाणी वरिष्ठ महाविद्यालय देण्याची विनंती त्यांनी केली. खासदार श्री संदीपानजी भुमरे साहेब यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मी देखील तुमच्यासारख्या खेड्या मध्ये असणाऱ्या शाळेत शिकलेलो आहे.त्यामुळे खेड्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी किती अडचणी येतात याची मला जाणीव आहे.त्यामुळे शाळेचा रस्त्याचे अपूर्ण राहिलेले काम लवकर पूर्ण करा असा सल्ला त्यांनी दिला.व भविष्यात देखील शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी काही अडचण आली तर नक्कीच सांगा ती अडचण दूर केली जाईल असे आवर्जून त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नारायण औटे यांनी केले तर आभार महाविद्यालयाचे प्राचार्यश्री.निलेशजी गायकवाड सर यांनी व्यक्त केले.या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन व शालेय साहित्य वाटप शाळेतील सहशिक्षक श्री बालाजी नलभे सर यांच्या स्वखर्चातून करण्यात आले होते.त्यामुळे श्री संदीपानजी भुमरे साहेब,संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांतजी गायकवाड साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य श्री निलेशजी गायकवाड सर यांनी त्यांचे कौतुक केले. यावेळी शाळेचे सहशिक्षक श्री नंदकिशोर पातकळ, श्रीमती स्वप्नजा पाटील ,विजय सपकाळ,सोन्याबापु पालवे,भाऊसाहेब गायकवाड, प्रकाश कामडी,अमोल गायकवाड,अनिता तारख,आकेश दांडेकर,प्रवीण काळे, शितल थिटे, स्वप्निल गव्हाणे,अस्मिता भिसे, अक्षय शेळके, निखिल पापुलवार, सतिष पवार, महेश गायकवाड, विठ्ठल त्रिभुवन, इत्यादी उपस्थित होते.

# वन महोत्सव-२०२४ अंतर्गत रोपे आपल्या दारी योजनेचा लाभ घ्यावा- वनपरिक्षेत्र अधिकारी गणेश शेवाळे

**केज/सचिन भालेराव**

वन महोत्सव-२०२४ अंतर्गत "रोपे आपल्या दारी"व केंद्र सरकार च्या " प्लॅन्ट फॉर मदर "एक पेड मां के नाम" योजने अंतर्गत नागरिकांमध्ये वृक्ष संवर्धन व पर्यावरण संरक्षण बाबत जागरुकता आणि वृक्ष लागवडीचे महत्व कळावे म्हणून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वन महोत्सव-२०२४ काळात सामाजिक वनीकरण विभागामार्फत शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, महाविद्यालये, बिगर शासकीय संस्था वृक्ष लागवडीचे अनुभव असणारे निसर्ग संवर्धन विषयक काम करणारे संस्था यांना स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत १५ जून ते ३० सप्टेंबर या काळात मोफत रोपे वाटप केली जाते, तसेच सामान्य नागरिकांना सर्वसाधारण कालावधीपेक्षा




सवलतीच्या दराने रोपांची विक्री जाते. त्या करिता १५ जून ते १५ ऑगस्ट. या कालावधीकारिता सामाजिक वनीकरण परिक्षेत्र केज येथील कार्यालयात रोप विक्री करिता स्टॉल उभारण्यात आला आहे. स्टॉलमध्ये विविध प्रजातीच्या लहान व उंच रोपे विक्रीस ठेव्यात आले आहेत. कन्या समृद्धी योजने अंतर्गत ज्या कुटुंबात मुलगी जन्मास येईल.त्या दाम्पत्यास १० रोपांचे मोफत वाटप केले जाते. त्यामुळे सर्व नागरिकांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन वन परिक्षेत्र अधिकारी गणेश शेवाळे सामाजिक वनीकरण केज यांनी केले आहे.

# येवता येथे खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त ह.भ.प. केशव महाराज शास्त्री टाकळीकर यांच्या कीर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन.

**केज/प्रतिनिधी**

केज तालुक्यातील येवता येथे बीडचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त ह.भ.प. केशव महाराज शास्त्री टाकळीकर यांच्या कीर्तना चे आयोजन करण्यात आले आहे तरी पंचक्रोशी तील नागरिकांनी कीर्तनाच्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रदीप तात्या जोगदंड सर यांनी केले आहे.खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी प्रदीप जोगदंड सर हेस्तुत्य उपक्रम घेत असल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक



केले जात आहे.दिनांक ६ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ठीक ६-०० वाजता येवता चौफाळा येथील जोगदंड सर यांच्या हॉटेलच्या भव्य मैदानात ह.भ.प.केशव महाराज शास्त्री टाकळीकर यांच्या अमृततुल्य कीर्तनाचे आयोजन केले आहे तरी पंचक्रोशीतील भाविकांनी या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रदीप तात्या जोगदंड सर यांनी केले आहे या कार्यक्रमाचे नियोजन गेल्या चार-पाच दिवसापासून येवता चौफाळा येथील प्रदीप जोगदंड सर यांच्या हॉटेलच्या भव्य मैदानात वॉटरप्रूफ मंडपाची तयारी चालू आहे.

# पेठ बीड भागातील असंख्य तरुणांचा अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश

## तरुणांची साथ ऊर्जा देणारी- अनिलदादा जगताप



**बीड/प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर पेठ बीड भागातील गांधी नगर येथील असंख्य युवकांनी काल दि. 5 जुलै रोजी रात्री 8.00 वाजताच्या दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली बीड शिवसेनेत प्रवेश केला. यापैकी पेठ बीड भागातील गांधी नगर येथील अमोल जाधव, आकाश गायकवाड, किरण गायकवाड, लक्ष्मण तात्या गायकवाड, अमर गायकवाड, अतुल गायकवाड, संदिपान जाधव, रोहित जाधव, विरेंद्र जाधव, योगेश सारुख, सचिन जाधव, संतोष धुरंदरे, कृष्णा जाधव, निखिल चव्हाण, यश गायकवाड, विकास गायकवाड, शुभम गायकवाड आणि अक्षय जगताप या सर्व तरुणांचे अनिलदादा जगताप यांनी शिवसेनेत स्वागत करून त्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केले. निवडणुकीच्या तोंडावर पेठ बीड भागातील गांधी नगरमधील सर्व तरुणांची मिळालेली साथ माझ्यासह बीड शिवसेनेची ऊर्जा वाढवणारी आहे. असे मत व्यक्त करत अनिलदादा जगताप यांनी शिवसेनेत नव्याने दाखल झालेल्या सर्व तरुणांचे मन:पूर्वक स्वागत केले. या दरम्यान जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आता नवीन होणाऱ्या आमदारांकडून केजला काय असतील अपेक्षा?






**विशेष प्रतिनिधी/**

केज विधानसभा मतदारसंघात केज शहर मध्यवर्ती ठिकाणी आहे. यामुळे केजच्या प्रश्नांवर होणाऱ्या आमदारांकडून खूप अपेक्षा आहेत. केज शहरातुन दोन राष्ट्रीय महामार्ग गेलेले आहेत. दोन्ही महामार्ग काही अंतरावर एकत्रित झालेले आहे यामुळे दोन्ही कडून येणारी प्रचंड वाहतूक एकत्रित होऊन काही अंतरावर पुढे जाते यामुळे वाहनांची खूप मोठी संख्या या ठिकाणी असते म्हणून अपघातांची संख्या देखील वाढती आहे. रस्ता ओलांडून जाणारी माणसं यामुळे धोक्यात असतात म्हणून या शहराला बायपास रस्ता खुपच आवश्यक झालेला आहे म्हणून लवकरात लवकर बायपास करण्यासाठी कार्य हाती घेणारा आता आमदार आवश्यक आहे. शहरातील अनेक भागात पाण्याची पुरेशी सोय नाही. याकरिता मोठी पाणी योजना राबविण्यासाठी प्रचंड इच्छाशक्ती असणारा नवीन आमदार आवश्यक आहे. केज हा खुप दिवसांनी तालुका आहे परंतु या ठिकाणी एमआयडीसी नाही, जर एमआयडीसी झाली तर छोटेमोठे उद्योग येतील आणि लोकांना रोजगार उपलब्ध होईल म्हणून नवीन आमदाराची या बाबतीत देखील इच्छाशक्ती असेल तर प्रश्न सुटणार आहे. केज शहरात एसटी डेपो होण्यासाठी जागा उपलब्ध आहे परंतु अनेकांच्या मागणीनंतरही अजून हा प्रश्न सुटला नाही म्हणून नवीन आमदाराची यावर लक्ष केंद्रित करून मंजुरी घेण्याची आवश्यकता आहे. याप्रमाणेच घाटनांदुर ते मांजरसुंबा असा रेल्वे मार्ग नियोजित आहे परंतु सत्ताधार्यांने कोणी फारसे लक्ष न घातल्याने तो मार्ग होऊ शकलेला नाही. यावर देखील मनोभावे काम करणाऱ्या आमदाराची केजकरांना आवश्यकता आहे. तसेच शहरातील फलोत्पादनाच्या जागेवर मार्केट करीता जागा उपलब्ध होण्यासाठी काम करणाऱ्या आमदाराची आवश्यकता आहे असी चर्चा सध्या सुरु असते .

# नेकनूर ग्रामपंचायतची नगरपंचायत होणार ?

**नेकनूर/ शेख शाकेर**

नेकनूर मध्ये नगरपंचायतचा ठराव घेण्यासाठी ग्रामपंचायत येथे ग्रामसभेची तारीख देण्यात आली आहे . नेकनूर ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायत करण्यासाठी ग्रामसभाचे ठराव आकर्षक होत आहे तरी ग्राम विकास अधिकारी सरपंच उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य ग्रामसभा घेण्यासाठी तारीख ठरविण्यात आली आहे त्यानुसार १०/७/२०२४ बैठक होणार आहे तरी सर्व गावकरी तरी या ग्रामसभेला उपस्थित राहून आपले मत व्यक्त करावे असे आवाहन राजा भैय्या यांनी केले आहे.

# पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत सिद्धेश आंबेकरचे यश 288 गुणांसह राज्यात दुसरा

**कुडूत्री/प्रतिनिधी** केंद्र शाळा ताराळे खुर्दचा विद्यार्थी सिद्धेश शैलेश आंबेकर याने ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत २८८ गुण मिळवून राज्यात दुसरा क्रमांक प्राप्त केला त्याच्या या यशाने ताराळे खुर्द परिसरात कौतुक होत आहे. या विद्यार्थ्याला मुख्याध्यापक बी. वाय. पाटील, माजी मुख्याध्यापक एस. वाय पाटील, मार्गदर्शक प्रकाश पाटील सर यांचेसह संजय जाधव सौ.सारिका पाटील,प्रकाश पोवार,स्मिता जाधव,युवराज पाटील,हर्षल खडतकर आदी शिक्षक ,तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नेताजीराव चौगले, उपाध्यक्ष वैशाली भोसले व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# मनोज जरांगे आज पासून घराबाहेर पडणार,

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे पुन्हा मैदानात उतरले आहेत. मराठा आंदोलनाचा चेहरा असलेले नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आक्रमक पवित्रा घेतला आहे. मनोज जरांगे पाटील उद्यापासून घराबाहेर पडणार आहेत. यासाठी त्यांनी काही विशिष्ट मार्गही ठरवले आहेत. आपल्या मुलांच्या भविष्यासाठी घराच्या बाहेर पडाव लागेल, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षण शांतता जनजागृती रॅली काढणार आहे. शनिवारी 6 जुलै ते 13 जुलैपर्यंत ही जनजागृती रॅली काढणार आहे. ही रॅली राज्यभरात टप्प्याटप्प्याने घेतली जाणार आहे. या जनजागृती रॅलीच्या पहिल्या टप्प्यात पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खानदेश या ठिकाणी रॅली काढली जाणार आहे, अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

# वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथे शेतीच्या वादातून एकास जब्बर मारहाण

**वडवणी/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात ढोरवाडी येथे शेतीचे वादातून एकाच जबर मारहाण करण्यात आली ही घटना दिनांक तीन जुलै २०२४ रोजी रात्री आठ वाजता घडली या घटनेमध्ये विश्वंभर नामदेव निर्मळ हे जबर जखमी झाले असून त्यांच्यावर छत्रपती संभाजी नगर येथील रुग्णालयामध्ये उपचार चालू आहेत. सविस्तर वृत्त असे की विश्वंभर निर्मळ हे त्यांचे शेतामध्ये गेले असता बांधाच्या कारणावरून त्यांचे शेजाऱ्या असलेल्या शेताचे मालक रोहिदास माने व इतर चार ते पाच यांनी शिवीगाळ केली व घरी आल्यानंतर जबर मारहाण केली या महाराणी मध्ये विश्वंभर नामदेव निर्मळ हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर छत्रपती संभाजी नगर येथील हॉस्पिटलमध्ये उपचार चालू आहे यावेळी त्यांचे कुटुंबीय भयभीत झाले असून लवकरात लवकर गुन्हा नोंद करण्यात यावा अशी मागणी त्यांच्यातर्फे करण्यात येत आहे. यामध्ये विश्वंभर निर्मळ यांचा मोठा मुलगा बाबासाहेब विश्वंभर निर्मळ हा देखील जखमी झाला असून त्याच्यावरही संभाजीनगर येथील रुग्णालयामध्ये उपचार चालू आहे

# वसुंधरा परिवार सोशल फाउंडेशनच्या वतीने वारकऱ्यांसाठी अन्नदान व सेवा करण्यात आली

**पुणे /पंकज भंडारी**

विठू माऊलीची आषाढी पंढरपूर वारी जगभर प्रसिद्ध आहे. गेली अनेक वर्षांपासून लाखो वारकरी भाविक माऊलीच्या दर्शनासाठी भक्तिभावाने हरीनाम गजर करत पायी पंढरपूरला जातात. ही पंढरपूरवारी म्हणजे एक दिव्य आनंद सोहळा. आणि ह्या वारकऱ्यांची सेवा म्हणजे साक्षात विठू माऊलीची सेवा म्हणून



वसुंधरा परिवार सोशल फाउंडेशनच्या संस्थापिका योगिता गोसावी दरवर्षी या वारकरी बंधू भगिनींना अन्नदान वाटप करून सेवा करतात. यावेळेस योगिनी एकादशी निमित्ताने ३५० वारकरी बंधू भगिनींना उपवास फराळ पॅकेट्स वाटप करून वारकरी सेवेचा खारीचा वाटा उचलला. या सेवेत संस्थेचे उपाध्यक्ष रामकुमार गुगळे, सचिव शैलेंद्र निर्मळे, सदस्य मनिषा कांबळे, अक्षदा जगताप, स्वप्नील तलाठी, वसुंधरा महिला बचतगटाच्या सुनंदा जाधव, दामिनी जाधव, धन्वंती नाथ, शशिकला महाडिक या सर्वांनी मोलाचे योगदान दिले.

# श्री क्षेत्र भगवानगडाची पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ

**भगवानगड/प्रतिनिधी**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाची पालखी आज शुक्रवार दि.५ जुलै रोजी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. हीच परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून ते आजतागायत सुरु आहे. श्री क्षेत्र भगवानगडावरुन निघणाऱ्या या पायी पालखी सोहळ्याचे शुक्रवार दि.५ जुलै रोजी दुपारी ठीक ४ वाजता पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे. पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, पिपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते. दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगांव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, संत भगवानबाबा संस्थान बोरकिन्ही,



भाग्येश्वर संस्थान, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान संभाजीनगर-पैठण-आळंदी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी संस्थान, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो. ह.भ.प.महंत न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या या भव्यदिव्य पालखी सोहळ्याच्या प्रस्थानावेळी भगवानगड परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती होती.

## मोहिते महाविद्यालयाच्या १० व्या वर्धापनदिनी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव ! मान्यवरांच्या शुभहस्ते वृक्षांचे रोपण

**पालघर/सौरभ कामडी**

खोडाळा : दहावी बारावीत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव गिरीवासी सेवा मंडळ, कल्याण संचलित मुरलीधर नानाजी मोहिते गुरुजी कला, वाणिज्य व विज्ञान आणि मातोश्री यशोदाबाई मुरलीधर मोहिते कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय खोडाळा या महाविद्यालयाच्या १० व्या वर्धापनदिनी करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालय परिसरात नॅशनल दलित मोमेंट्व फॉर जस्टीसचे राज्य सचिव वैभव गीते, भाऊराव तायडे आणि विकी शिलवंत यांच्या शुभहस्ते वृक्षांचे रोपण करण्यात आले. मोहिते महाविद्यालय दरवर्षी आपल्या वर्धापन दिनानिमित्त दहावी, बारावीत प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव करून प्रोत्साहित करते. याही वर्षी महाविद्यालयाच्या १० व्या वर्धापनदिनी मोखाड्यासह वाडा, जव्हार, शहापूर, त्र्यंबकेश्वर व इगतपुरी तालुक्यातील दहावी, बारावीत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करून गौरविण्यात आले. यात आदिवासी विकास हक्क संघर्ष समितीनेही सहभाग नोंदविला. आदिवासी आणि मागासवर्गीय मुलं शिकावीत आणि आपल्या आदिवासी समाजाचे नाव उज्वल करावे या उद्देशाने आपण शिक्षणाची दारे खुले केल्याचे प्रतिपादन गिरीवासी सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ चंद्रमणी मोहिते यांनी केले. वटवृक्षाच्या पारंब्याप्रमाणे महाविद्यालयात विविध शाखा येऊन महाविद्यालयाची वर्षागणिक प्रगती होत आहे. येथील आदिवासी विद्यार्थ्यांनी या शिक्षण संकुलाचा लाभ घेऊन आपली उन्नती साधावी असे प्रतिपादन मोखाडा पंचायत समिती उपसभापती



तथा आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी केले. यावेळी माजी उपसभापती एकनाथ झुगरे, मोखाडा तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पालवे यांनीही आपल्या मनोगतातून महाविद्यालयाला वर्धापन दिनी शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे खजिनदार भास्कर खोळंबे, सदस्य सुशांत मोहिते, ज्योती कडलग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अनिल पाटील, उपप्राचार्य प्रा. यशवंत शिद, प्रा. तुकाराम रोकडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रवर्तन काशीद, प्रा. माधुरी अहिरे, प्रा.रघुनाथ मोरे, प्रा. मेघा सोनटक्के, सिद्धार्थ मोहिते, मयुरी नागवंशी, नामदेव ठोंबरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नवनाथ शिंगवे यांनी केले तर मान्यवरांचे आभार गिरीवासी सेवा मंडळाचे सचिव प्रा. दीपक कडलग यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कुंडलिक खांडेना न्यायालयीन कोठडी ३०७ च्या गुन्ह्यात पोलिसांनी अटक केली होती



बीड/प्रतिनिधी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे हे शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे मारहाण प्रकरणात आरोपात नाव असल्याने त्यांच्यावर ग्रामीण पोलीस ठाण्यात ३०७ गुन्ह्य दाखल करण्यात आला होता. गेल्या आठवड्यात नगर जिल्ह्यातून खांडे यांना पोलिसानी ताब्यात घेतले होते, सहा दिवसाची पोलीस कोठडी संपल्यानंतर आज न्यायालयात हजर केले असता त्यांना १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली. यावेळी न्यायालय परिसरामध्ये कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत परळीत संत नामदेव महाराज पालखीचा नेत्रदीपक रिंगण सोहळा संपन्न

## भव्य दिव्य रिंगण सोहळयाने भाविकांच्या डोळयाचे पारणे फेडले

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी** आषाढी एकादशीच्या निमित्याने नर्सी नामदेव येथून पंढरपूरसाठी निघालेल्या संत नामदेव महाराजांच्या पालखीचे तीर्थक्षेत्र परळी वैजनाथ नगरीत आज शुक्रवार दिनांक ५ जुलै रोजी आगमन रिंगणत ४ वाजता झाले. टाळ, मृदंगाच्या निनादात पालखी मुख्य मार्गाने मार्गक्रमण करीत असताना मंगलमयी वातावरणाने परिसर भारून गेला होता. तर पालखीचा रिंगण सोहळा नेत्रदीपक ठरला.अ.भा. वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने हा पालखी सोहळयाने भव्य दिव्य डोळयांचे पारणे फेडणारा रिंगण सोहळा परळीकरांनी पाहिला. संत नामदेवांच्या जन्मस्थळापासून निघालेल्या पालखीचे पंढरपूरपर्यंत जाण्यासाठी एकूण २२ टप्पे होतात. यातील एक टप्पा हा पंचम ज्योतिर्लिंग परळी वैजनाथ येथे आहे. परळी वैजनाथ नगरीत दुपारी पालखी दाखल झाली होती. अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष





ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने पालखीचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी महिलांनी पूजा करून पालखीचे दर्शन घेतले. विविध मान्यवरांनीही पालखीच्या स्वागतासाठी हजेरी लावत दर्शन घेतले. हाती भगवी पताका घेवून अगदी शिस्तीत जाणारे वारकरी, टाळ -मृदंगाचा गजर यामुळे भक्तीमय वातावरण झाले होते. त्यानंतर नाथरोडवरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जत्रा मैदानावर पालखी पोहोचली. तेथे वारकऱ्यांनी भजने गात सर्वांचीच मने जिंकली. तर रिंगणामध्ये मानाचा असलेला संत नामदेव महाराज यांचा अश्व धावल्यानंतर इतर अश्व धावले. तर घोडेस्वारांनी यावेळी विविध कवायती सादर केल्या. काळजाचा ठोका चुकविणाऱ्या या कवायती टिपण्यासाठी अनेकांचे कॅमेरे सरसावले होते. या कार्यक्रमास अ.भा. वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी व नगर परिषद, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. एकंदरीत ज्ञानोबा माऊलीच्या जयघोषाने परळी वैजनाथ नगरी दुमदुमली होती. पालखीचे स्वागत करण्यासाठी विविध राजकीय, सामाजिक धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील सदस्य, पदाधिकारी मंडळी तसेच परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.

## चिरनेर आदिवासी आश्रम शाळेत अन्नदान व शैक्षणिक साहित्य वाटप





**उरण/विठ्ठल ममताबादे**

चिरनेर आदिवासी आश्रम शाळा मध्ये जे.व्ही के सुतार फाउंडेशन यांच्या माध्यमातून कु. कै.विनीत किसन सुतार यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व मुलांना शैक्षणिक साहित्याचा वाटप तसेच अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते किसन सुतार आणि सामाजिक संस्था तसेच शेतकरी कामगार पक्षाचे माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडी अध्यक्षा सीमा अनंत घरत,विधानसभा युवक अध्यक्ष मयुर सुतार, पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, शेवा गावच्या ग्रामपंचायत सदस्य भावना भोईर, रोहित भोईर मंजुळा घरत परेश घरत, एल जी म्हात्रे आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## आपला भाऊ म्हणून कोणत्याही वेळी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार-खा.वसंतराव चव्हाण

नायगाव/हानुमंत चंदनकर

प्रहार दिव्यांग क्रांती संघटना आणि जनशक्ती पक्षाच्या सर्व तालुकाध्यक्षांनी कोणत्याही प्रश्नासाठी आपण पुढाकार घ्यावे मी आपला भाऊ म्हणून आपल्या पाठीशी खंबीरपणे कोणत्याही वेळी उभा राहणार असे मत खासदार वसंतराव चव्हाण यांनी आ. बच्चुभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त नायगाव येथे आयोजित कार्यक्रमात आपले विचार व्यक्त केले.

प्रहार संघटनेचे नेते आ. बच्चू भाऊ कडू यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नायगाव तालुका शाखेच्या वतीने शहरातील मार्कंडे मंदिर नायगांव येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी खासदार वसंतराव चव्हाण,तर माधवराव बेळगे, नगरसेवक पंकज पाटील चव्हाण, जनशक्तीचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पाटील देशमुख, प्रहारचे जिल्हाध्यक्ष पंढरीनाथ हुंडेकर, हनुमंतराव पाटील सुजलेगावकर, गणेश पाटील हांडे, हावगीरराव पाटील, संतोष



हनमंते, राजीव पतंगे, शिवलिंग माटोरे, गंगाधर शेवाळकर, कमलाकर टाकळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात योगायोगाने प्रहार संघटनेचे नायगाव तालुकाध्यक्ष साईनाथ बोईनवाड, अनिल शेटे, गोविंद लोणे यांचाही वाढदिवस असल्याने साजरा करण्यात आला. सदर संघटनेच्या वतीने खासदार वसंतराव चव्हाण यांचा सामूहिकरित्या सत्कार करण्यात आला. प्रहार संघटना व जनशक्ती पक्षाचे जिल्ह्यातील तालुकाध्यक्ष राहुल अहंकारे लोहा,अनिल शेट्ट मुदखेड, साईनाथ जुनेकर धर्माबाद, हनुमंत सिताफुले बिलोली, हनुमंत ढगे भोकर, संतोष चामरेकर अर्धापूर, साहेबराव निवडंगे मुदखेड, गोविंदराव लोणे मुदखेड, राजश्री गवलवाड मुखेड, ओमप्रकाश निलावार व राजू आंगडे देगलूर, संजय भरकटे लोहा यांचीही उपस्थिती होती. तर खा. चव्हाण पुढे म्हणाले की, बच्चुभाऊ कडू अपंगासाठी हक्क मागणारा एक बुलंद आवाज आहे माझ्याकडूनही त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व माझ्या विजयासाठी आपण मेहनत घेतली हे मी कदापि विसरणार नाही म्हणून अपंग बांधवांचे त्यांनी आभार मानले यावेळी नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्ष संघटनेचे पदाधिकारी यासह प्रहारचे गोपीनाथ मुंडे आंबटवार.मारुती मंगरुळे, राजेश बेळेगे, साईनाथ बोईनवाड, चंद्रकांत आईलवार, मिलिंद कागडे, प्रकाश नागोरे, एनडी आढाव यासह अनेकांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मारुती मंगरुळे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077